# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

# विधान भवन, मुंबई



## : : प्रसिध्दी पत्रक : :

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ - महाराष्ट्र राज्यातील चिकित्सा आस्थापनांची नोंदणी, विनियमन व तपासणी करण्यासाठी, अशा आस्थापनांद्वारे ज्या सुविधा व सेवा पुरविण्यात येतील त्यांची किमान मानके विहित करण्याकरिता; आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी विधेयक.... यावरील सूचना / सुधारणा मागविणे**

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ - महाराष्ट्र राज्यातील चिकित्सा आस्थापनांची नोंदणी, विनियमन व तपासणी करण्यासाठी, अशा आस्थापनांद्वारे ज्या सुविधा व सेवा पुरविण्यात येतील त्यांची किमान मानके विहित करण्याकरिता; आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी हे विधेयक श्री.प्रकाश आबिटकर, मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली घटित केलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात आले आहे. या विधेयकातील तरतुदींच्या अनुषंगाने **राज्यातील जनता तसेच संबंधित विषय क्षेत्रात काम करणाऱ्या विविध सामाजिक संस्था / संघटना / NGOs** यांचेकडून सूचना/सुधारणा मागविण्याचा निर्णय समितीने दिनांक २९ जुलै, २०२६ रोजी झालेल्या बैठकीत घेतला आहे. त्यानुसार सूचना/सुधारणा पाठवू इच्छिणाऱ्या उपरोक्त संबंधितांनी आपल्या सूचना/सुधारणा तीन प्रतींमध्ये गुरुवार, दिनांक २० ऑगस्ट, २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी पोहोचतील अशा बेताने निम्नस्वाक्षरीत श्री.जितेंद्र भोळे,सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, बॅकबे रेक्लमेशन, मुंबई-४०००३२ यांच्याकडे **"सर्वसाधारण" व "खंडनिहाय"** या स्वरुपात पाठवाव्यात किंवा महाराष्ट्र विधानमंडळाच्या **"www.mls.org.in"** या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या (**https://mahalegislature.org.in/assembly-bill-51/**) या लिंकवर देण्यात आलेल्या **गुगल फॉर्म (Google Form)** द्वारे **युनिकोड फॉन्ट (Unicode Font)** मध्ये पाठवाव्यात.

उक्त विधेयकाच्या मराठी व इंग्रजी प्रती शासकीय ग्रंथागार पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर तसेच व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड, मुंबई-४००००४ यांचेकडे विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

तसेच सदरहू विधेयक (मराठी/इंग्रजी) महाराष्ट्र विधानमंडळाच्या उपरोक्त संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : ३ ऑगस्ट, २०२६**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**